# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक ३०/०५/२०२६ (शनिवार)

---

## नागपूर ग्रामीण जिल्हया अंतर्गत अवैध दारू व्यवसायांवर केलेल्या कारवाई बाबत..

नागपूर ग्रामीण पोलीस दलामार्फत गेल्या वर्षभरात (जून २०२५ पासून मे २०२६ पर्यंत) अवैध दारू बाबत व्यापक आणि प्रभावी कारवाई करण्यात आली आहे. मा. श्री हर्ष ए पोद्दर, पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात वेळोवेळी विशेष मोहीमा राबविण्यात आल्या तसेच भारतीय न्याय संहीता या नविन कायदयामधील किरकोळ संघटीत गुन्हेगारीचे कलम ११२ अन्वये नागपुर ग्रामीण पोलीसांनी प्रभावी कारवाई केलेली आहे.

नागपूर ग्रामीण जिल्हा पोलिसांनी जून २०२५ पासून मे २०२६ पर्यंत अवैध दारू विरोधी मोहिमे अंतर्गत ९८ वेळा आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे. अवैध दारू प्रकरणातील एकुण १३,६१६ आरोपींची नियीमत तपासणी (चेकींग) करून त्यांच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यात आले. **MPDA** अंतर्गत ०६ आरोपींना स्थानबध्द करण्यात आले असुन १५ आरोपीविरूध्द **MPDA** प्रस्तावीत आहेत., ४७ आरोपी हद्दपार करण्यात आले आहे. याशिवाय ५६ आरोपीविरूध्द हद्दपार प्रकरण प्रस्तावीत आहेत. सन २०२६ मध्ये मे २०२६ पर्यंत महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये १,५५५ गुन्हे दाखल करण्यात आले असून, त्यामध्ये १,२४,१७,३६९/— किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. मागील वर्षाच्या तुलनेत मुद्देमाल जप्तीच्या प्रमाणात ४ टक्क्यांची वाढ नोंदविण्यात आली आहे. तसेच भारतीय न्याय संहिता कलम ११२ अंतर्गत अवैध दारू व्यवसायातील संघटीत प्रकारे गुन्हे करणाऱ्या टोळी विरूध्द ६८ गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करण्यात आली आहे.

**नागपूर ग्रामीण पोलीस दलाची अवैध दारू व्यवसाय व त्यातील संघटित गुन्हेगारी विरोधातील मोहीम यापुढेही अधिक प्रभावीपणे सुरू राहणार आहे.**

## ठेवीदारांची लाखोंची फसवणूक करणारा मुख्य आरोपी अटकेत
## आर्थिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीण यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन सावनेर अंतर्गत दाखल अप. क्र. ४९१/२०२६ कलम ३१६(२), ३१६(५), ३१८(२), ३१८(४), ३(५) भारतीय न्याय संहिता २०२३ सहकलम कलम ३ महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय आस्थापनांमधील) हितसंबंधांचे संरक्षण अधिनियम, १९९९ – एम.पी. आय.डी. कायदयान्वये नोंद असलेल्या ठेवीदार फसवणूक प्रकरणाचा तपास आर्थिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीण करीत आहे. आज दिनांक ३०/०५/२०२६ रोजी आर्थिक गुन्हे शाखेच्या पथकाने तांत्रिक पुरावे तसेच कौशल्यपुर्ण तपास करून सदर गुन्ह्यातील पाहिजे असलेला मुख्य आरोपी नामे सुनिल मधुकर बावणे, ३८ वर्षे, पान उबाली, ता. कळमेश्वर जि नागपुर यांला याला ताब्यात घेतले आहे..**

सदर गुन्ह्यातील मुख्य आरोपी सुनिल मधुकर बावणे आणि त्याचे साथीदार प्रमोद श्रीराम सोमकुवर व मंगेश सुभाषराव मनकवडे हे विदर्भ अर्बन मल्टीपल ऑपरेटिव्ह इंडिया निधी लिमिटेड, शाखा सावनेर चे संचालक होते. त्यांनी नागरिकांना आरडी, एफडी व डेली कलेक्शन योजनांमध्ये गुंतवणूक केल्यास आकर्षक परतावा व लाभांश मिळेल, असे आमिष दाखवून मोठ्या प्रमाणात ठेवी स्वीकारल्या होत्या. सदर प्रकरणाच्या तपासात असे निष्पन्न झाले की, फिर्यादी व इतर एजंटांमार्फत एकूण ५२८ ठेवीदारांकडून ६५,८३,५८१ रुपये जमा करून ते संस्थेच्या बॅंक खात्यात जमा करण्यात आले. मात्र आरोपींनी सदर रकमेचा अपहार करून ठेवीदारांची व एजंटांची फसवणूक केली.

**या प्रकरणात आरोपी प्रमोद श्रीराम सोमकुवर, वय ४१ वर्ष रा. वार्ड नं. १५ शिवमंदीर जवळ म्हसेपठार रोड मोहपा, ता. कळमेश्वर जि. नागपुर आणि मंगेश सुभाषराव मनकवडे, वय ४६ वर्ष रा. प्लॉट नं. ४२ हुडकेश्वर रोड, पिपळा फाटा, विद्या नगर हुडकेश्वर बु. नागपुर जि. नागपुर यांना यापूर्वी अनुक्रमे दिनांक ०५/०५/२०२६ आणि दिनांक ०४/०५/२०२६ रोजी अटक करण्यात आली होती. तर सदर गुन्हयात पाहीजे असलेला**

**मुख्य आरोपी सुनिल मधुकर बावणे याचा आर्थिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीण यांनी तांत्रिक पुराव्यांचे आणि इतर माहितीचे सखाले विश्लेषण करून नमुद आरोपीला आज दिनांक ३०/०५/२०२६ रोजी भगत नगर नागपूर येथुन ताब्यात घेतले आहे सदर आरोपीच्या अटकेची प्रक्रिया सुरू आहे.**

## पोलीस स्टेशन कळमेश्वर अंतर्गत खुनाचा गुन्हा उघड
## आरोपीला अटक
## स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

पोलीस स्टेशन कळमेश्वर :— **स्थानिक गुन्हें शाखा नागपुर ग्रामीण यांच्या तपास पथकाने बेपत्ता व्यक्तीच्या अस्कमात मृत्यु प्रकरणाचा सखोल तपास करून खुनाचा गुन्हा उघड केला आहे.** सदर प्रकरणाताली मयत नामे योगेश तुळशीराम सांभारे, वय ३६ वर्षे रा. निंबोली, ता. कळमेश्वर जि. नागपुर हा दिनांक ११/०५/२६ रोजी निंबोली येथुन बेपत्ता झाला होता. त्यानंतर दिनांक १७/०५/२६ रोजी त्याचे प्रेत निबोली उपरवाही शेत शिवारातील एका विहीरीमध्ये मिळुन आले. सदर प्रकरणी पोलीस स्टेशन कळमेश्वर कलम १९४ भान्यासं अन्वये अकस्मात मृत्युची नोंद करण्यात आली होती.

सदर प्रकरणाचा सखोल तपास करण्यासाठी मा. श्री हर्ष ए पोद्दर, पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे एक विशेष तपास पथक नेमण्यात आले. स्थानिक गुन्हे शाखा यांनी केलेल्या समांतर तपासातून खुनाचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. सदर प्रकरणात मयताच्या नातेवाईकांची चौकशी, तांत्रिक पुराव्यांचे विश्लेषण तसेच गुप्त बातमीदारांकडून प्राप्त माहितीच्या आधारे संशयित आरोपी धनराज विठोबाजी मोदरकर, वय ३७ वर्षे, रा. निंबोली, ता. कळमेश्वर, जि. नागपूर यास ताब्यात घेऊन त्यांची सखोल चौकशी करण्यात आली.चौकशी दरम्यान आरोपीने दिलेल्या माहितीनुसार मयत हा आरोपीच्या पत्नीचा पाठलाग करून तिला त्रास देत असल्याचे व धमकावत असल्याचे आरोपीला समजले त्यामुळे आरोपीला मयताचा राग आल्याने दिनांक ११/०५/२०२६ रोजी आरोपीने मौजा निंबोली येथील भोयर याचे शेतामध्ये मयत याचे डोक्यावर कुऱ्हाडीने मारून त्याचा खुन केला तसेच त्यानंतर मयताचे प्रेत कॅनल रोडकडील सत्रांचे बागेतील विहीरीत नेवुन टाकले आणि इतर पुरावे नष्ट केल्याची माहीती प्राप्त झाली.आरोपीकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे सदर प्रकरणात

खुनाचा गुन्हा निष्पन्न करण्यात आला असून, त्यानुसार पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे कलम १०३ भान्यासं अन्वये खुनाचा गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**नमुद आरोपीला कळमेश्वर पोलसांनी अटक केली आहे.**

## पोलीस ठाणे जलालखेडा हद्दीत विशेष मोहीम राबवून मौजा रामठी येथे अवैधरित्या मोहाफुल गावठी हातभट्टीची दारू निर्मिती तसेच देशी, विदेशी दारू विक्री,सेवन करणाऱ्यांवर १० गुन्हे नोंद, ८१ हजार १२० रूपयांचा मुद्देमाल जप्त

## जलालखेडा पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन जलालखेडा :—** दिनांक ३०/०५/२०२६ रोजी जलालखेडा पोलीस स्टेशन हद्दीतील मौजा रामठी येथे अवैधरित्या देशी, विदेशी दारूची तस्करी करणाऱ्या तसेच मोहाफुल गावठी दारू गाळणारे व विक्री करणाऱ्यांविरोधात विशेष मोहीम राबविण्यात आली. मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक,नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री. पराग पोटे, उपविभागिय पोलीस अधिकारी काटोल उपविभाग यांच्या मार्गदर्शनात जलालखेडा पोलीसांनी, दंगा नियंत्रण पथक आणि होमगार्ड यांच्यासह मौजा रामठी येथे **आरोपी नामे १) संगतसिंग देवीसिंग बावरी, वय ३९ वर्ष, रा. रामठी, ता. नरखेड २) फुलसिंग देवीसिंग बावरी, वय ३७ वर्ष, रा. रामठी, ता. नरखेड ३) कैलास सिंग देवीसिंग बावरी, रा. रामठी, ता. नरखेड ४) तुफानसिंग उत्तमसिंग भादा, वय ६६ वर्ष, रा. रामठी, ता. नरखेड ५) शेरसिंग देवीसिंग बावरी, वय ४७ वर्ष, रा. रामठी, ता. नरखेड ६) सुनीलसिंग चंदासिंग बावरी, वय ३७ वर्ष, रा. रामठी, ता. नरखेड ७) सुंदरसिंग चंदासिंग बावरी, वय ३९ वर्ष, रा. रामठी, ता. नरखेड यांचेवर कारवाई नमुद ७ आरोपींवर ६ गुन्हे नोंद करण्यात आले.** पोलीसांनी घटनास्थळावरून एकुण ४६५ लिटर मोहाफुल गावठी दारू तसेच ४१० लिटर मोहाफुल रसायन सडवा असा एकुण ६०,८५०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करून रनिंग हातभट्टया नष्ट केल्या. तसेच आरोपीतांचे ताब्यातून १) Officer Choice Blue कंपनीच्या विदेशी दारूच्या ०७ निपा २) Royal Stag च्या विदेशी दारूच्या ०९ निपा ३) प्बवदपब ैपजम च्या विदेशी दारूच्या ०९ निपा ४) देशी दारूच्या १३ निपा असा

एकुण ८१, १२०/—रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.तसेच १) कैलास नामदेवराव घोरपडे वय — ४० वर्षे, रा. खरबडी ,२) उत्तम दशरथ मसराम, वय ४० वर्षे, रा. जामगाव ३) दीपक गुलाबराव ठाकरे, वय ४२ वर्षे, रा. मेंढला,४) अनिल भानुदास सोनोने, वय ३२ वर्षे, रा. खरबडी दारूचे सेवन करतांना मिळुन आल्याने त्यांचेवर प्रत्येकी एक असे **महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये एकुण ४ गुन्हे नोंदविण्यात आले आहे.**

**पोलीसांनी घटनास्थळावरून पंचासमक्ष एकुण ४६५ लिटर मोहाफुल गावठी दारू तसेच ४१० लिटर मोहाफुल रसायन सडवा, वेगवेगळया कंपनीच्या विदेशी दारूच्या २५ निपा आणि देशी दारूच्या १३ निपा असा एकुण ८१,१२०/— रूपयांचा माल जप्त केला. नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला. नमुद आरोपीतांविरुद्ध जलालखेडा पोलीस ठाणेस महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये एकुण १० गुन्हे नोंदविण्यात आले आहे.**



# कळमेश्वर पोलीस स्टेशन अंतर्गत मौजा गोंडखैरी शिवरात पायदळ पेट्रालींग आणि विशेष कोंबिग ऑपरेशन राबवुन अवैध दारू निर्मिती व विक्री करणाऱ्यांवर ७ गुन्हे नोंद

## ५ लाख १७ हजार ५०० रूपयांचा मुद्देमाल जप्त

आज दिनांक ३०/०५/२०२६ रोजी मा. श्री हर्ष ए पोद्दर, पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात श्री सागर खर्डे, सहा पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर यांच्या नेतृत्वात ,पोलीस निरीक्षक श्री मनोज काळबांधे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन कळमेश्वर यांच्यासह कळमेश्वर पोलीस ,दंगा नियंत्रण पथक आणि होमगार्ड यांनी पोलीस स्टेशन कळमेश्वर अंतर्गत मौजा गोंडखैरी परिसरात पायदळ पेट्रोलिंग व विशेष कॉम्बिंग ऑपरेशन राबवून अवैध दारू निर्मिती व विक्री करणाऱ्यांविरुद्ध कारवाई केली आहे.

सदर कारवाईत कळमेश्वर पोलीसांनी अवैध दारू निर्मिती आणि विक्री करणाऱ्यांविरुद्ध कारवाई करून, ०४ महिला आरोपीं आणि ०३ अज्ञात आरोपींविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम अन्वये एकुण ०७ गुन्हे नोंद केले आहेत. सदर कारवाई एकुण १३,४०० लिटर सडवा किंमती ४,६९,००० /— रूपये , १५० लिटर देशी दारू किंमती १५,०००/— रूपये तसेच इतर साहित्य किंमती ३३,५०० /— रूपये असा एकूण किंमती ५,१७,५००/— रूपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.



# जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद २० गोवंश जनावरांची सुटका, मौदा पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन मौदा**:— दिनांक ३०/०५/२०२६ रोजी मौदा पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, भंडाराकडुन नागपूरकडे मौदा मार्गे अवैधरित्या जनावरांची वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी महादुला फाटा (बोरगाव) येथे नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान दोन संशयित वाहन मिळुन आले. १) बोलेरो पिकअप वाहन क्र. एम एच—४०/सी टी—८७४० २) बोलेरो गाडी क्र. एम एच—४० डी सी— २४७३ मिळुन आले. पोलीसांनी वाहन थांबवण्याचा इशारा केला असता चालक घटनास्थळाहुन पोलीसांना पाहुन पळुन गेले. पोलीसांनी पंचासमक्ष दोन्ही वाहनाची तपासणी केली असता वाहन क्र. १) मध्ये ११ गोवंश जनावरे तसेच वाहन क्र. २) मध्ये ०९ गोवंश जनावरे मिळुन आले. पंचासमक्ष दोन्ही वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये एकुण २० गोवंश जनावरे असे मिळुन आले. नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अंत्यत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन,शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन निर्दयतेने वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले. पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून १) दोन्ही वाहन किंमती ११,००,०००/—रूपये आणि दोन्ही वाहनातील २० गोवंश जनावरे असा एकुण १२८२,०००/— रूपयांचा मुददेमाल जप्त केला आहे.

नमुद प्रकरणी वाहन चालक व मालक यांचेविरूध्द कलम ११(१) (ड) (ई) (फ) प्रा. छ. अधि. १९६०, सहकलम ५अ, (१), ९ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.



# नागपूर ग्रामीण जिल्हयात अवैध जुगार चालवणाऱ्यावर ०२ गुन्हे नोंद.

दिनांक २९/०५/२०२६ रोजी महाराष्ट्र जुगार कायदा अंतर्गत पोलीस स्टेशन कन्हान, मौदा यांनी अवैधरित्या सट्टापट्टी तसेच ५२ ताशपत्त्याचा जुगार खेळणाऱ्या/खेळविणाऱ्या आरोपीतांवर छापा टाकुन ५२ ताशपत्ते, सट्टापट्टी साहित्य व रोख रक्कम असा एकुण २१९०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र जुगार अधिनियमान्वये एकुण ०२ गुन्हे दाखल करण्यात आले आहे. ते खालीलप्रमाणे.

**पोलीस स्टेशन कन्हान** येथे आरोपी नामे राकेश किशोरीलाल कश्यप, वय ४५ वर्ष, रा. इंदर कॉलोनी नं ०६, पाणी टंकी जवळ खदान, ता. पारशिवनी, जि.नागपुर २) अर्जुन शिवजनक राजभर, वय ३२ वर्ष, रा. खदान नं ०६, पाणी टंकी जवळ कन्हान, ता. पारशिवनी यांचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन मौदा** येथे आरोपी नामे १) अमित अभिमन शेंद्रे, वय ३० वर्ष, रा. नांदगाव मौदा, जि. नागपूर २) राजेश जयसिंग दुधबर्वे, वय ५० वर्ष, ३) नागेश्वर सुखदेव सोनवाने, वय ३८ वर्ष, रा. दोन्ही रा. चिरव्हा, ता. मौदा यांचेवर ०१ गुन्हा नोंद.

## नागपूर ग्रामीण जिल्हयात अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या आरोपींविरूध्द एन.डी.पी.एस कायदयान्वये ०२ गुन्हे नोंद

दिनांक २९/०५/२०२६ रोजी नागपूर ग्रामीण जिल्हयांतर्गत अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या आरोपींविरूद्ध खालीलप्रमाणे गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन कळमेश्वर** अंतर्गत पोलीस पेट्रोलींग करीत असतांना आरोपी नासीर नझीर पठाण, वय ३० वर्ष, रा. वैशाली नगर ब्राम्हणी, वार्ड नं ०३, कळमेश्वर हा मोहपा आठवडी बाजार येथे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आले. **तसेच** आरोपी विक्की रामकृष्ण भलावी, वय १९ वर्ष, रा. वार्ड नं ०२, झोपडपटटी येरला, जि. नागपूर हा राजीवगांधी स्टेडीयम मोहपा येथे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला.

## नागपुर ग्रामीण जिल्ह्यातील ८४६ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक ३०/०५/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २३ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ८४६ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुट्टीबोरी येथे ३३ आरोपी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३२ आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३३ आरोपी अशा एकुण ९८ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ४८ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे २७ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २९ आणि पोलीस

स्टेशन वेलतुर ३५ आरोपी पोलीस स्टेशन पाचगाव १५ आरोपी अशा एकुण १५४ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ९१ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ३९ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे २९ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३७ आरोपी अशा एकुण १९६ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३१ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे २३ आरोपी पोलीस स्टेशन वडोदा येथे १८ आरोपी अशा एकुण ७२ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ५३ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३५ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे ३३ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे २३ आरोपी अशा एकुण १४४ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ६० आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ५० आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे ४२ आरोपी अशा एकुण १८२ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**(सर्व ६ उपविभागातील सर्व २३ पोलीस स्टेशन येथे एकुण ८४६ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे. )**



मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने